Date : / /
Page No.: 9

# गुढी पाडवा

चैत्र शुक्ल प्रतिपदेचे संस्कृत नांव 'गुढी पाडवा' आहे. हा दिवस चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी साजरा करतात, जो हिंदू पंचागाप्रमाणे वर्षाचा पहिला दिवस असतो. 'पाडवा' किंवा 'पाडवो' हा शब्द संस्कृत शब्द 'पड्डवा / पड्डवो' पासून आला, ज्याचा अर्थ आहे चंद्राच्या वाढत्या कलेचा (शुक्ल पक्षाचा) पहिला दिवस जो संस्कृत मध्ये प्रतिपदा या नावे ओळखला जातो.

गुढी पाडवा हा पंचांगानुसार मानल्या जाणाऱ्या साडे तीन मुहूर्तांपैकी एक आहे, ज्या दिवशी कुठलीही वेळ नवीन कार्य, उद्योगधंदा किंवा वैयक्तिक कामाला सुरवात करण्यासाठी पवित्र मानली जाते.

गुढी उभारण्यामागे महत्वाचं कारण म्हणजे गुढी ही राजा शालीवाहनचा शक वरील विजयाचे प्रतिक आहे. त्याच्या राज्यातील लोकांनी त्याचे पैठणमध्ये आगमन झाल्यानंतर गुढी उभारली होती. तर इतिहासाप्रमाणे भगवान श्रीरामाच्या विजयाचे आणि रावणाचा वध केल्यानंतर अयोध्येला परतण्यामुळे झालेल्या आनंदाचे प्रतिक आहे. प्रतीक उंच धरतात म्हणून गुडी (गुढी) देखील उंच उभारली जाते. असेही मानले जाते की रामाचा राज्याभिषेक झाला तेव्हा हा सण साजरा झाला. गुढी पाडवा हा सण छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखाली मराठा सैनिकांना मिळालेल्या विजयाचे द्योतक आहे. छ.शिवाजी महाराजांनी खुप शौर्याने लढून मुघालांच्या वर्चस्वाखाली मराठा साम्राज्य स्थापित केले; योध्दांचे युध्दामधे विजय मिळवून घरी परतण्याचे द्योतक आहे. असे मानतात की, गुढी वाईट शक्तींना घरापासून दूर ठेवते, समृध्दी आणि भाग्य घरी आमंत्रित करते.

निसर्गातही वृक्षवेलींना नवी पालवी फुटण्याचा हा काळ असतो. बांबु, रेशमी वस्त्र, तांब्या, आंब्याची डहाळी, कडुनिंबाची कोवळी पाने, बत्ताशांची माळ (गाठी) या सारख्या नैसर्गिक व आरोग्याला पुरक गोष्टी वापरुन गुढी उभारली जाते. असे म्हणतात की जी गोष्ट पूर्ण वर्षभर करायची असेल, ती वर्षाच्या पहील्या दिवशी निश्चित करावी. बत्ताशाच्या माळेच्या रुपाने मधूर चवीपासून ते कडूनिंबाच्या रुपाने कडू तुरट चवीपर्यंत सर्व रसांचे महत्व या सणाच्या रुपाने सांगितले जाते.

Page No.: २

गुढीचे स्थान मुख्य दरवाज्याच्या उजव्या बाजूला असते. उजवी बाजू ही आत्म्याच्या सक्रीयतेचे प्रतिक आहे. गुढी पाडव्याला गावाकडचे लोक अंगण शेणाने सारवतात, शहरातील लोक वेळ काढून साफसफाई करतात. स्त्रिया, मुली दारासमोर सुबक रांगोळी काढतात. घराचा मुख्य दरवाजा रंगीत फुले व तोरणांनी सजवला जातो. गुढीसाठी उजळ, पिवळे, शेंदरी जरी असलेले कापड लांब बांबूच्या टोकाला बांधतात. त्यावर गाठी, कडुनिंबाची, आंब्याची डहाळी, झेंडूच्या फुलांची माळ बांधतात, तांब्याचा कलश उलटा ठेवतात. अशी ही गुढी गच्चीवर उंच ठिकाणी बांधतात.

## गुढी पाडवा

गुढी पाडव्याची परंपरा अनोखी, आहे खुप खुप वर्षापासूनची जुनी
जगाची झाली होती निर्मिती, देवर्षी ब्रह्माच्या हस्ते आजच्याच दिनी ---
झाला इथूनच सुरु कालगणनेचा प्रारंभ, विजय नाम संवत्सराने शुभारंभ
दारी तोरण, सडा संमार्जन, रंगावलीने सुशोभित अंगण
प्रवेश द्वारावरी डोलात उंच गुढी शोभतसे मंगल ---
पौराणिक आख्यायिका पण महती सणाची सांगते अखंड
होवूनी प्रसन्न इंद्रदेवाने, वसुराजाला दिला राजदंड ---
घरी आणताच टोकाला बांधूनी, रेशमी वस्त्र भरजरी
ठेविला सुवर्णाचा चंबु त्यावरी, सुगंधित पुष्पमाला भरजरी ---
साखरेच्या गाठी पदकांची माळ, कोवळा कोवळा कडूनिंबाचा मोहोर
नैवेद्याशी ठेवूनी यथासांग उभारीली उंच, होवूनी आनंदविभोर ---
तेव्हापासून वर्षानुवर्षे घरोघरी गुढीची ~~खास~~ परंपरा खास ही
चैत्रमासाच्या नववर्षदिनी होतसे अत्यानंदे साजरी आज ही ---
हिंदू पर्वणी साधून, चौदा वर्षांचा वनवास संपवूनी
आले प्रभु श्रीराम जानकी लक्ष्मणासह अयोध्येस परतूनी ---
स्वागतास त्यांच्या सजली होती नगरी, गुढ्या तोरणे उभारुनी ---
संपन्न अशा या गुढीपाडवा संस्कृतीचे संवर्धन करुया आनंदानी !! ---

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.